**प्रेस नोट दि. २३/०४/२०२५**

## सराईत गुन्हेगाराकडुन, घरफोडीचा ०१ व मोटार सायकल चोरीचे ०२ असे एकुण ०३ गुन्हे उघडकीस

## शहर गुन्हे शाखेची कामगिरी

---

मागील कांही दिवसापुर्वी ईश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर येथे रात्रीचे वेळी ०१ मोटार सायकल चोरीचा व ०१ घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार पोह/१३७९ बापू साठे, पोशि/१७२५ सुभाष मुंढे, पोशि/१६०२ वसिम शेख, पोशि/१७१२ सैपन सय्यद असे मिळुन सोलापूर शहर परिसरात, सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करुन, तसेच बातमीदारामार्फत माहिती काढुन, अशाप्रकारे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेत होते.

त्या अनुषंगाने, दि.२०/०४/२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यावरुन, इसम नामे- शुभम अशोक मडीवाळ, वय- २० वर्षे, सध्या रा. १ नंबर कॉलनी, १ नंबर लेन, टेकवडे पेट्रोल पंपामागे, आकाशवाणी, हडपसर, पुणे, कायम रा. हनुमान मंदीराजवळ, दोड्डी रोड, कुंभारी, सोलापूर यास महालक्ष्मी मंदीर ते मार्केट यार्ड, सोलापूर येथील रस्त्यावरुन दि. २०/०४/२०२५ रोजी ०२.०५ वा. ताब्यात घेतले, तेथे आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याच्याजवळ रोख रक्कम २५००० रुपये व एक सोन्याचा बदाम मिळून आला. तसेच त्याच्या जवळ दोन मोटार सायकल मिळून आल्या. त्याबाबत त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने - (१) दि.०७/०४/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वा. साईबाबा चौक, सोलापूर हिरो होंडा कंपनीची पॅशन मोटार सायकल, (२) दि.०८/०४/२०२४ रोजी रात्री १२.३० वा. च्या सुमारास अरमान रेसिडेन्सी, मल्लीकार्जुन नगर, सोलापूर येथून स्पलेंडर मोटार सायकल क्र. MH १३ DZ १८९२ ही मोटार सायकल व त्याच दिवशी (३) समर्थ रेसेडेन्सी, ईश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर येथे रात्री ०२.३० वा. येथील बंद घराचे कुलुप तोडून त्या घरातुन एक ०५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा बदाम व रोख रक्कम ४०,००० रुपये चोरी केले असुन, सदरची २५००० रुपये रोख रक्कम ही त्यातील शिल्लक राहिलेली रक्कम असल्याचे सांगुन, वरीलप्रमाणे ०१ घरफोडीचा व ०२ मोटार सायकल चोरीचे असे एकूण ०३ गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे.

यातील **आरोपी नामे - शुभम अशोक मडीवाळ** याच्याकडून खालीलप्रमाणे ०१ घरफोडीचा व ०२ मोटार सायकल चोरीचे असे एकूण ०३ गुन्हे उघडकीस आणुन त्याच्याकडून नमुद ०३ गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल- ०.५ ग्रॅम सोन्याचे दागिने, २५,००० रुपये रोख रक्कम, ०२ मोटार सायकल असा एकूण ९५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**सदरची कामगिरी, श्री.एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उपआयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्री.राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, वसीम शेख, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, चापोशि सतिश काटे, सायबर शाखेकडील पो.अमलदार प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.**

